INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 2 | MARCH - 2023

# पर्यटनाच्या दृष्टिकोनातून सिद्धेश्वर गड्डा यात्रेचे महत्व

**प्रमोद रमेश हंचाटे**
(M.A.,D.Ed.,B.Ed.,SET)
मुख्याध्यापक - हिंगुलांबिका प्राथमिक शाळा, सोलापूर.
**डॉ. तुकाराम नारायण शिंदे**
(M.A.,SET,Ph.D.)
इतिहास विभागप्रमुख, ए.आर. बुर्ला महाविद्यालय सोलापूर.



काळाच्या ओघात नगरांची नावं ही बदलत जातात. जसे पुंडरिकपूर चे 'पंढरपूर' झाले. पुण्यनगरी चे 'पुणे' अलंकापूरीचे 'आळंदी' झाले. तसेच आजच्या सोलापूरचे नाव अकराव्या बाराव्या शतकात 'सुवर्णपूर' 'सोन्नलिगे' असे होते. हे शिवयोगी सिद्धारामेश्वरांनी वसविलेले अत्यंत पवित्र नगर होते. ज्याला 'अभिनव श्रीशैलम' असही त्या काळी म्हटलं जात असे. पुंडलिकच्या नावाने जसे 'पुंडरिकपूर' नाव रूढ झाले. तसेच सिद्धरामेश्वरांनी वसविलेले नगर 'सोन्नलिगे' तथा 'सोन्नलापूर'-'सोलापूर' असा या नामाचा विकास झालेला दिसतो. काही इतिहास संशोधकाच्या मते सोलापूर जिल्ह्याचे नाव हे समूहवाचक आहे. म्हणजे सोळा गावांनी मिळून सोलापूर हे नाव तयार झाले आहे. त्यांची नावे १.अहमदपूर २.अदिलापूर ३.चमलादेव ४.फत्तेपूर ५.जामदारवाडी ६.शेकपूर ७.सोलापूर ८.सोन्नलगी ९.सोनापूर १०.काळजापूर ११.खादरपूर १२.खंडेराववाडी १३.महमदपूर १४.राणापूर १५.संदलपूर १६.वैद्यवाडी अशी आहेत.

विविध ऐतिहासिक साधनातून सोलापूर शहराच्या नावाबद्दलची माहिती मिळते. सोलापूर ग्रामनामचा उल्लेख काही ताम्रशिलांमधून सोन्नलिगे, सोन्नलगे म्हणजेच सोलापूर होय. श्री सिद्धरामेश्वरांच्या काळात सोन्नलिगे येथे नागप्पा जहागिरदार आणि त्यांची पत्नी चामलादेवी राहत होते. त्यांनीच श्री सिद्धरामेश्वरास गाव वसविण्यासाठी एक कोस प्रदेश दिल्याचा उल्लेख आहे. गुंजेगाव, अक्कलकोट, तडवळ, कामती खुर्द व आचेगाव इत्यादी ठिकाणी सापडलेल्या शिलालेखात सोन्नलपूरच्या कपिलसिद्ध मल्लिकार्जुन देवस्थानास दान दिल्याचा उल्लेख आहे.[१] पुरातत्व उत्खननामध्ये प्राप्त झालेल्या तांब्याच्या वस्तू व वस्तू उद्योगाची प्राचीनता महाराष्ट्रातील सोनारांच्या कामगिरीवरून दिसून येते. शिलाहार राजा गंडरादित्य यांचा शके १०५८ च्या कोल्हापूर येथील शिलालेखामध्ये सोनाराने द्यावयाच्या करास सुवर्णकर म्हटले आहे. तशाच स्वरुपात सोन्नलिगे नगराचाही उल्लेख यादवराजा महादेव यांच्या शके ११८६ च्या संगुर लेखात आणि जैतुगी यांच्या तिथीसहित जामगाव ताम्रपटात सापडतो यावरूनही सोन्नलिगे स्थलनाम सोनारांचे अस्तित्व दर्शविणारे वाटते. मोहोळ तालुक्यातील कामती खुर्द येथे एक संस्कृत

शिलालेख आहे. तो इ.स. १२३८ या वर्षातील असून त्यामध्ये सोलापूर शहराचे नाव सोनालीपूर असे दिसून येते. मध्ययुगीन काळात यादवांच्या राजवटीच्या अस्तानंतर मुस्लिम काळात सोलापूर या शहराचे संदलपूर हे नाव होते. त्यानंतर सोलापूर हे नाव रूढ झाले.[२] देवगिरीच्या यादवांच्या शासन काळात सोलापूर परिसरात वीरशैव संप्रदायचे मोठे केंद्र होते. या काळात सोलापूर विभागामध्ये सोन्नलिगे येथे वीरशैव पंथाचे थोर संत श्री सिद्धरामेश्वर यांचे मूळठिकाण होते. त्यामुळे सोन्नलिगे या ग्रामास वीरशैवांचा पवित्र आणि महत्वपूर्ण दर्जा प्राप्त झालेला होता. कवी राघवांक यांनी रचलेल्या सिद्धराम पुराणामध्ये असा उल्लेख आहे की "सिद्धरामेश्वराने सोन्नलिगे येथे तलाव बांधून शिवलिंगाची स्थापना केली." इ.स. ११६० मध्ये होऊन गेलेल्या बसवेश्वरांच्या बहिणीचा मुलगा चन्नबसव यांचाही सोन्नलिगे या स्थळांशी संबंध होता.[३] प्रसिद्ध इतिहास संशोधक ग. ह. खरे यांनी १६ खेडी मिळून सोलापूर हे नाव मिळाले असावे असे म्हटले आहे. शोळा म्हणजे सोला आणि पूर म्हणजे खेडी यावरून शोलापूर, सोलापूर असे नाव प्राप्त झाले.[४] ज्या सोळा खेड्यापासून सोलापूर शहर बनले त्या सोळा खेड्यात स्वन्नलगी, सोलापूर, सोनापूर या खेड्यांची नावे सोलापूर शहराच्या नावाशी मिळती जुळती आहेत. स्वन्नलगी म्हणजे 'सुवर्णवल्ली' या शब्दावरून सोलापूर हे सोन्यासारखे सुंदर होते, असा अर्थ प्राप्त होतो. ब्रिटिश राजवटीत सोलापूर या शब्दाचा उच्चार 'शोलापूर' असा केला जात होता. स्वन्नलगीचे स्वन्नलपूर, स्वन्नलपूरचे स्वल्लापूर आणि स्वल्लापूरचे सोलापूर झाले असावे. सन १९७४ मध्ये महाराष्ट्र सरकारने शोलापूर चे सोलापूर अशी दुरूस्ती करून सोलापूर हे नाव निश्चित केले.[५]

## सिद्धरामेश्वरांबाबत माहिती

आजपर्यंत अनेक श्रेष्ठ शिवयोगी प्राचीन काळापासून होऊन गेलेले आहेत. त्यांनी शिवयोगाचा उपयोग लोककल्याण आणि धर्मप्रसारासाठी केला. अश्या शिवयोग्यांच्या परंपरेतील सोलापूरचे शिवयोगी सिद्धरामेश्वर हे एक श्रेष्ठ शिवयोगी होते. परमवैराग्यशील अल्लमप्रभूंनी श्रेष्ठ व्यक्तिमत्वाबद्दल 'प्रकाशातील प्रकाश, ज्योतीरहित प्रभा' असे म्हटले आहे. सिद्धेश्वरकालीन सर्व शिवशरणांनी 'शिवयोगी' सिद्धरामेश्वरांची मुक्त कंठाने प्रशंसा केली आहे. सिद्धराम शिवयोगी होते असे संशोधकांनीच नव्हे तर स्वतः सिद्धरामांनी एका वचनातून व्यक्त केले आहे.

"लाभले नीललोचनेस लिंगपूजा केल्याचे फळ,
लाभले चन्नबसवण्णांस जंगमपूजा केल्याचे फळ,
लाभले अजगनण्णांस मंत्रपूजा केल्याचे फळ,
लाभले शिवयोगी सिद्धरामास योगाची पूजा केल्याचे फळ,
देखा कपिलसिद्ध मल्लिकार्जुन".[६]

शिवयोगी सिद्धरामेश्वर हे शिवयोग साधनेतील अत्युच्च शिखरावर पोहोचलेले साधक होते. जन्मत:च त्यांच्याकडे शिवयोग होता. नंतर आणखी साधना करून ते अत्युच्च अवस्थेला पोहोचले होते. शिवयोगी सिद्धरामेश्वरांची सावली पडत नसे. आणि चालताना त्यांची पावले उमटत नसत, असे त्यांच्याविषयी सांगितले जाते. याविषयी अल्लमप्रभूंच्या पुढील वाक्यावरून पुष्टी मिळते. 'शिवयोग केलेल्या साधकाची सावली पडत नाही आणि त्यांची पावले उमटत नाहीत'.[७]

श्री सिद्धरामेश्वरांचा जन्म 'सोन्नलिगे' येथे मुद्दगौडा व सुग्गलादेवी यांच्यापोटी इ. स. ११२७ मध्ये झाला.[८] सिद्धरामांचे बालपणीचे नाव धुळीमहंकाळ होते हे सिद्धरामेश्वरांच्या कुलदैवताचे नाव आहे. बाराव्या शतकाच्या दरम्यान बसवेश्वरांच्या समकालीन म्हणून श्री सिद्धरामांना ओळखले जाते, त्यांनी महाराष्ट्रात लिंगायत पंथाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर केला. महात्मा

बसवेश्वरांनी अठरा-पगड जातीतील स्त्री-पुरुषांसाठी वैचारिक चिंतन आणि संवाद करण्यासाठी १२ व्या शतकात कर्नाटकातील कल्याणी येथे 'अनुभव मंटप' नावाचे सामाजिक व सांस्कृतिक विचारपीठ निर्माण केले.[९] बसवेश्वरांच्या अनुभव मंटपात अक्कमहादेवी, अल्लमप्रभू, चेन्नबसवण्णा यांच्याबरोबर सिद्धरामेश्वर होते. चेन्नबसवेश्वरांकडून सिद्धरामांना इष्टलिंगाची धारणा आणि षटस्थळ ज्ञान धारणेचा बोध झाला.[१०] श्री सिद्धरामांनी आपल्या वचनातील अनुभव गीतामध्ये स्वत:चे वीरशैवत्व स्पष्ट सांगितले आहे. कारण षटस्थल आणि अष्टावरणाबद्दल सिद्धरामांनी लेखन केलेले आहे आणि हे दोन्ही वीरशैवत्व स्पष्ट करणारे आहेत. जसे-

"तन शुद्ध झाले माझे चन्नबसवण्णांच्या कारणे ,
जीव शुद्ध झाला माझा बसवण्णांच्या कारणे ,
भाव शुद्ध झाला माझा प्रभूदेवांच्या कारणे ,
अशा या तन, जीव, भाव यात इष्ट, प्राण,भाव लिंगाची खून जाणून ,
झालो मी परवश आश्चर्याच्या आविगे कपिलसिद्ध मल्लिकार्जुन".

सिद्धरामांनी ६८ हजार वचने लिहिली, परंतु त्यांनी लिहिलेली सर्व वचने आज उपलब्ध नाहीत. कर्नाटक विश्वविद्यालयाने संशोधन केल्यामुळे १४०० वचने सापडली आहेत. सिद्धरामांच्या प्रत्येक वचनांच्या अखेरीस 'कपिलसिद्ध मल्लिकार्जुन ' असे अंकित आहे. सिद्धरामेश्वरांशी संबंधित एकूण ३६ शिलालेख आजपर्यंत उपलब्ध झाले आहेत. यांपैकी सर्वाधिक शिलालेख सोलापूर जिल्हयात उपलब्ध असून त्यांची संख्या १२ आहे. त्यानंतर विजयपूर जिल्ह्यात ११, धारवाड ५, धाराशिव ४, शिवमोग्गा, मंड्य, चित्रदुर्ग या जिल्ह्यांत प्रत्येकी १ शिलालेख सापडला आहे.[११] शिलालेख व काव्यात शिवयोगी सिद्धरामांचा जगदगुरु असा उल्लेख आहे. कवी राघवांकने तर शैव साम्राज्य चालवणारा चक्रवर्ती असा गौरव केला आहे.

शिवयोगी सिद्धरामेश्वरांनी शिवयोगाबरोबरच कर्मयोगालाही महत्व दिले. त्यांच्या कार्याची किर्ती ऐकून अनेक देशांचे राजे सिद्धरामेश्वरांच्या दर्शनाला आले होते. त्याचवेळी राणी चामलादेवी एक नवे शहर निर्माण करण्याकरिता सिद्धरामेश्वरांना जमीन देते. त्यावेळी तलाव खोदत असताना एक काहील भरून सोने सापडते. त्याच उत्पन्नातून सिद्धरामेश्वर आपल्या आराध्यदैवत श्री मल्लिकार्जुनाचे मंदिर बांधतात व त्याच परिसरात १६ लिंगांची स्थापना एकाच मुहूर्तावर करतात. गरीब निराश्रितांसाठी अन्नछत्र सुरू केले. लोकोद्धारासाठी जागोजागी ६८ शिवलिंगे, ६८ तीर्थे, क्षेत्राच्या अष्टदिशेस कालभैरव व त्यांच्या अष्टशक्ती यांची शहर विस्तारांसह स्थापना केली.[१२] सोलापूरच्या आठ दिशेला आठ गणपती स्थापन केले. त्याचबरोबर जगामध्ये ज्ञात उपलब्ध पुराणातून सामूहिक विवाहाचा पाहिला प्रयोग सिद्धरामेश्वरांनी सोन्नलगी नगरीत केला. दर तीन वर्षांनी एक हजार याप्रमाणे एकूण २१ वर्षात सात हजार लोकांचे विवाह सिद्धरामेश्वरांनी लावून दिले. त्याच विवाहाची आठवण म्हणून प्रतीकात्मक विवाहसोहळा यात्रेच्या निम्मित्ताने भरवला जातो. सामुदायिक विवाहाचे इतके प्राचीन उल्लेख जगाच्या पाठीवर कोठेच नाहीत. त्यामुळे सोलापूरची ओळख सामुदायिक विवाह सोहळे प्रथम सुरुवात करणारे गाव म्हणूनही आहे. सिद्धरामेश्वरांच्या या अलौकीक कार्यामुळेच ते सोलापूरचे ग्रामदैवत बनले. सिद्धरामेश्वरांचे जन्मस्थान, कर्मस्थान, तपोभूमी व त्यांचे समाधीस्थान अशी तीनही पवित्र स्थाने या सोलापूरात असल्यामुळे या पावन क्षेत्राला अनन्य साधारण महत्व प्राप्त झालेले आहे.[१३] दा.का. थावरे यांनी 'आठशे साडे आठशे वर्षापूर्वी सिद्धरामेश्वरांच्या रूपाने एक तेजोवलय महाराष्ट्राच्या ललाटी चमकून गेले असे म्हटले आहे'.

### श्री सिद्धेश्वर मंदिर

महाराष्ट्रातील प्रसिद्ध मंदिरांपैकी सिद्धरामेश्वरांचे मंदिर आहे. सिद्धेश्वर तलावाच्या मध्यभागी पूर्वाभिमुख असलेल्या या मंदिराचे बांधकाम ८०० वर्षापूर्वी झाले आहे. हे एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र व पर्यटनस्थळ म्हणून नावारूपास आले आहे. महात्मा बसवेश्वरांच्या कल्याण येथील अनुभवमंटपात सिद्धरामेश्वरांनी वीरशैव पंथाचे धडे घेतल्यानंतर सिद्धेश्वर तलावाच्या काठी पश्चिमेकडील बाजूस मल्लिकार्जुन मंदिर बांधले. त्यानंतर त्यांच्या सामाजिक व धार्मिक कार्यास चालना मिळत गेली. आज ज्या ठिकाणी सिद्धेश्वर मंदिर आहे, त्याठिकाणी सिद्धरामेश्वरांच्या योगसाधनेची जागा होती. मंदिराच्या बाजूला त्यांचे समाधीस्थळ होते या स्थळास 'योगसमाधी' अथवा 'योगीनाथ' असे नाव आहे. सिद्धेश्वर मंदिराचे संपूर्ण काळ्या बेसाल्ट दगड व चुन्यात केलेले बांधकाम अतिशय कौशल्याचे व तंत्रशुद्ध आहे. मंदिराच्या अंतराळात चांदीच्या पत्र्याने मढविलेला पश्चिमाभिमुख नंदी असून गाभाऱ्यात चांदीचा देव्हारा व पिंडीवर चांदीचा सिद्धरामेश्वरांचा मुखवटा आहे या मुखवटयास विडयाच्या पानांची व फुलांची सजावट केलेली असते. त्याचबरोबर सिद्धेश्वर मंदिर परिसरात अनेक देवदेवतांची मंदिरे आहेत. त्यामध्ये सिद्धरामेश्वरांनी स्थापन केलेल्या ६८ लिंगापैकी श्री ओंकारेश्वर लिंग, श्री संगमेश्वर लिंग, श्री परमेश्वर लिंग, श्री माहेश्वर लिंग, श्री अकलेश्वर लिंग, श्री अमृतलिंग, श्री योगीनाथ लिंग, श्री आहेश्वर लिंग, श्री वज्रेश्वर लिंग, श्री पापेश्वर लिंग अशी दहा लिंगे मंदिर परिसरातच आहेत शिवाय सिद्धरामेश्वरांची योग समाधी, येडूर बिल्लेशाचे मंदिर, नातलवाड विरविरेश्वर मंदिर, पांडुरंग मंदिर, अल्लम प्रभूलिंग इत्यादी मंदिरांचा त्यात समावेश होतो.

### सिद्धेश्वर तलाव

मल्लिकार्जुन मंदिरात अन्नछत्र उघडल्या नंतर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी, म्हणून मल्लिकार्जुन मंदिराच्या पूर्वेला तलाव खोदण्यास प्रारंभ केला.[१४] त्यावेळी शहरातील अनेक लोकांनी त्यासाठी आर्थिक मदत पुरविली. कष्टाला श्रमाला प्रतिष्ठा देणाऱ्या सिद्धरामांनी श्रमप्रतिष्ठेचा धडा घालून दिला आहे. स्वत: हातात पहार घेऊन तलाव खोदण्यास सुरुवात केली. ४ हजार लोकांनी उत्स्फूर्तपणे श्रमदान केले. तेव्हा सर्वोपयोगी तलाव निर्माण झाला. यामुळे सुमारे ९०० वर्षांपासून अनेक जीव जगले, जगत आहेत. कोणतेही काम पूज्यभावाने केल्यास आनंद मिळतो. त्यांच्या वचनात तलावाबद्दल ते म्हणतात.

" केरेयल्लिय तीर्थ, मनदल्लिय सर्वजीवद्यापरत्व मैदेगेदडे,

निम्म पादसाक्षी, यन्न मनसाक्षी कपिलसिद्ध मल्लिकार्जुना."

या तलावातील पवित्र तीर्थ पूज्यभाव सोडणार नाही. आणि माझे मन सर्व प्राणिमात्राबद्दल दया भाव सोडणार नाही, हे कधीही होणार नाही. याला तुमचे चरण, माझे मन साक्ष आहे कपिलसिद्ध मल्लिकार्जुना. अशा पूज्य भावाने त्यांनी कार्य केले म्हणूनच सोलापूर ( सोन्नलगी ) हे आज पवित्र तीर्थक्षेत्र, शिवक्षेत्र म्हणून प्रसिद्ध झाले. त्यांनी शिवसानिध्यात श्रमपरिहार होऊन चित्तशांती मिळते, हे लोकांना पटवून दिले.[१५] सोलापूरच्या भूमीवरील सजीव आनंदाने जगावेत, त्यांचे जीवन सुखी व्हावे यासाठी या परिसरात त्यांनी निसर्गसृष्टी निर्माण केली. सिद्धरामेश्वरांनी तलाव खोदून पिण्याच्या पाण्याबरोबरच शेतीच्या पाण्याचीही सोय सोलापूरसारख्या दुष्काळी भागाकरिता केली होती. त्यांच्या कृतीतून शेतीचे महत्व ही बाब समजून येते. सोलापूर शहराच्या भौगोलिक परिस्थितीचे, भूगर्भातील व भूगोलाचे सर्वस्वी ज्ञान असणाऱ्या सिद्धरामेश्वरांच्या अलौकीक व अचाट बुद्धिमत्तेचे एक वेगळ्या दृष्टीने मूल्यांकन होते. ते म्हणजे जलक्रांतीचे जनक श्री सिद्धरामेश्वर. शिवपुराणात वर्णिल्याप्रमाणे आजच्या सिद्धेश्वर तलावाची निर्मिती करून त्याभोवती झाडे वाढवून पशुपक्ष्यांना आसरा व निवारा त्यांनी दिला. सिद्धरामेश्वरांनी

वचन दिल्याप्रमाणे सोलापूरच्या तळ्याचे पाणी कधीही आटणार नाही. ते आजही आटले नाही, याची प्रचिती येते.[१६] सिद्धरामेश्वर दररोज सकाळी तुडुंब भरलेल्या तलावाच्या मध्यभागी असलेल्या बेटावर ध्यानस्थ बसत. त्यांना एकांतवास आवडे. पुढे त्याच ठिकाणी समाधी घेण्याचे त्यांनी ठरविले, असे सिद्धरामेश्वर कर्मयोगी होते.

## सोलापूरची गड्डायात्रा

सर्व जयंत्या, उत्सव अन सर्व जातींचे सणवार सगळे मिळून साजरे करणारे आमचे हे मायेच्या माणसाचे तरीही थोडेसे उग्र बोलीभाषेचे सगळ्यांच्या मनामनातले गाव, सोलापूर!!! अशा या मुलुखावेगळ्या गावाची दर वर्षी भरणारी हौसेची - नवलाची यात्रा म्हणजे 'गड्डा यात्रा'!! सिद्धेश्वर महाराजांचा अड्ड ( पालखी ) यात्रा महोत्सव म्हणजेच गड्डा यात्रा![१७] सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वरांची गड्डा यात्रा फार मोठ्या प्रमाणावर साजरी केली जाते.

मकर संक्रांतीच्या वेळी पाच दिवस सोलापूरात शिवयोगी सिद्धरामेश्वरांची मोठी जत्रा भरते. त्यावेळी नंदीध्वजाची मिरवणूक निघते त्यावेळेचा उत्सव पाहण्यासारखा असतो. नंदीध्वज हे या यात्रेचे मुख्य आकर्षण असतात. यासच श्री सिद्धरामेश्वरांच्या काठ्या अथवा योगदंड म्हणण्याचा प्रघात आहे. यामागची पार्श्वभूमी श्री सिद्धरामेश्वरांची वचन खंड-१ या पुस्तकात यात्रा व परंपरा या प्रस्तावनेत सिद्धेश्वरांच्या विवाहाविषयीची माहिती व अक्षता सोहळ्याचे वर्णन केलेले आहे. कुंभारकन्येची सिद्धरामांबरोबर लग्न करण्याची इच्छा होती. तेव्हा योगदंडाशी लग्न करावे असे सिद्धराम सांगताच तिचे लग्न योगदंडाशी केले जाते व सिद्धरामांनीच मंगलाष्टके म्हटली असा उल्लेख आहे. म्हणूनच योगदंडाचे प्रतिक म्हणून नंदीध्वजाची मिरवणूक काढली जाते. योगदंडाचा मान शहरातील विविध जातीतील लोकांना मिळालेला आहे. सिद्धरामेश्वरांची पहिली काठी ( नंदीध्वज ) ही सिद्धेश्वर देवस्थानची असते. दुसरी काठी ( नंदीध्वज ) कसब्यातील देशमुखांची, तिसरी काठी लिंगायत माळी समाजाची, चौथी काठी ब्राम्हणांची, पाचवी काठी सुतार लोकांची, सहावी काठी मातंग समाजाची, आणि सातवी काठी महार समाजाची असे प्रतिनिधीत्व सर्व समाजाला देण्यात येते.[१८] अंगात पांढरी शुभ्र बाराबंदी घालून, धवलशुभ्र धोतर नेसून डोईला घेरदार मुंडासे बांधलेले भक्तगण अन त्यांच्या भक्कम हातात अलगद विराजमान असलेले उत्तुंग देखणे नंदीध्वज जेंव्हा ६८ लिंगांना तैलाभिषेक करून प्रदक्षिणा घालण्याच्या निमित्ताने शहरपरिक्रमाच पूर्ण करतात तेव्हा सगळे शहर त्या शुभ्ररंगात न्हाऊन निघते अन भक्तीशक्तीचा हा सोहळा पुढे पुढे जात राहतो. भक्तलिंग "हर्र बोला हर्र, सिद्धेश्वर महाराज की जय" या जयघोषात शहर दुमदुमते. संमती कट्ट्यावरचे विधी असोत वा होमकुंडातले विधी असो वा वासराकडून केल्या जाणाऱ्या भाकणूकीचा कानोसा घेणं असो, ते विहंगम दृश्य आपल्या डोळ्यात साठविण्यासाठी सारं शहर लोटलेले असते. या यात्रेचे गारूड काही औरच असते, इथला जल्लोष न्याराच असतो हे सगळेजणच मान्य करतात.

१२ जानेवारीच्या हुतात्मा दिवसापासून यात्रेची सुरुवात होते. असे म्हणतात की, ब्रिटीशांनी सोलापूरच्या स्वातंत्र्य सैनिकांना फाशी देण्यासाठी मुद्दाम ही यात्रा सुरू होण्याचा दिवस निवडला. त्या वर्षी अर्थातच सोलापूर इतके सुन्न झाले होते की यात्रा झालीच नाही. त्यानंतर दरवर्षी मात्र हुतात्मांच्या स्मरणाने यात्रा सुरू होते. १२ तारखेच्या दुपारी नंदीध्वजाची पहिली नगरप्रदक्षिणा होते. सिद्धेश्वरांनी स्थापलेल्या गावाच्या सीमेवरची ६८ लिंगे यावेळी पूजली जातात. १३ तारखेला भोगी अक्षतेचा दिवस. १४ तारखेला मकर संक्रांतीदिवशी होम आणि वासराच्या भाकणूकीचा कार्यक्रम असतो. जो कृषी संस्कृतीशी आपल्याला जोडतो. १५ तारखेला दारूकामाने यात्रेची सांगता होते. पण यात्रेतील धार्मिक कार्यक्रम संपले तरी दुकाने पुढे २६ जानेवारीपर्यंत सुरूच असतात. सोलापूरातली मंडळी रमत गमत गड्डा यात्रा अनुभवतात.[१९] होम मैदान अन तिथे भरणारी

ग्रामदैवत सिद्धेश्वरांची गड्डा यात्रा ही आम्हा सोलापूरकरांची ओळख आहे. प्रसिद्ध असलेला भाग्यश्री बटाटावडा, लक्ष्मीप्रसाद चिवडा, रसपानगृहे, विविध खाद्यपदार्थांची रेलचेल असणारी दुकाने, शेतीमालाचे देखणे प्रदर्शन, हस्तकलांच्या सामग्रीची दुकाने, धार्मिक-शासकीय ग्रंथ प्रदर्शन, भले मोठाले वेगवेगळ्या आकारातील पाळणे, विविध मनोरंजनाची पुरेपूर हमी देणारी आनंदनगरी, सौंदर्यप्रसाधनांपासून ते खेळण्यांपर्यंत अनेक वस्तूंची बाजारपेठ ही यात्रेतली नेहमीची वैशिष्टे असतात. पण तरीही ती इथल्या प्रत्येकास ओढ लावत राहते जानेवारीच्या थंडीच्या मोसमात तलावाच्या पाण्यात सिद्धरामेश्वरांच्या मंदिराचे देखणे प्रतिबिंब रात्र वाढेल तसतसे पसरत जाते अन होम मैदानाकडे आलेली पावले समाधान मनाने तृप्त होऊन घरी परततात हा इथला शिरस्ता पिढी दर पिढी चालू आहे, लहानपणीच्या गड्डा यात्रेच्या आठवणी हा प्रत्येक सोलापूरी माणसाचा हळवा कोपरा असतो यातच या यात्रेचे अन सिद्धरामेश्वरांच्या आस्थेचे यश सामावले आहे हे सांगताना माझी छाती अभिमानाने फुलून येते. या यात्रेस महाराष्ट्र आणि दक्षिण भारतातील विविध प्रांतातून लोक हजेरी लावतात. त्यामुळे या यात्रेस राष्ट्रीय एकात्मतेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. म्हणूनच महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात एक महिनाभर चालणारी शिवयोगी सिद्धरमेश्वरांची गड्डा यात्रा अद्वितीयच आहे.

## यात्रेसाठी बाहेरून येणारे पर्यटक

महाराष्ट्रासह कर्नाटक व आंध्र प्रदेशात श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर यांच्याशी संबंधित अनेक मंदिरे, गुहा आदी स्थळे आहेत. एकटया कर्नाटकातच ८० हून अधिक स्थळे असल्याचे संशोधनातून स्पष्ट झाले आहे. बसवकल्याण, विजयपूर, चिक्कमंगळूर, शिवामोगा, चित्रदुर्ग, तुमकुर ( कर्नाटक ) व राज्यातील लातूर यांचा समावेश आहे मात्र, सोलापूरच्या देवस्थानाला या सर्व मंदिरे आणि स्माराकांहुन वेगळेपण लाभले आहे. शहरात तलावाच्या मध्यभागी मंदिर, विस्तीर्ण परिसर, किल्ल्याचे सान्निध्य यामुळे हे मंदिर भाविकभक्तांसह सोलापूरात येणाऱ्या पर्यटकासाठीही आकर्षणाचा केंद्रबिंदू राहीला आहे.[२०]

जानेवारी महिन्यात सिद्धेश्वर यात्रा म्हणजेच गड्डा यात्रेला पर्यटक मोठया प्रमाणात येतात. यामध्ये धार्मिक कारणांबरोबरच शेती, व्यापार, खरेदी, विक्री, मनोरंजन यांचाही समावेश असतो. आपल्या राज्यातील इतर जिल्ह्यातील लोक तर येतातच त्याबरोबरच शेजारच्या कर्नाटक, तेलंगण, आंध्र प्रदेश या राज्यांतील पर्यटकांबरोबरच मूळचे सोलापूरचे असलेले अनेक विदेशी पर्यटकही गड्डा यात्रेला हजेरी लावतात. शिक्षण, नोकरी आणि व्यवसायाच्या निमित्ताने परदेशात असलेल्या सोलापूरकरांनी गड्डा यात्रेबद्दल आपल्या आठवणी ई सकाळसोबत शेअर केल्या आहेत. गीतांजली साळोखे-माने ( यूएसए ) म्हणतात, " अमेरिकेत आल्यानंतर मी डिस्ने पार्क, युनिव्हर्सल स्टुडिओ आणि इतर अनेक ठिकाणी भेट दिली आहे, परंतु सोलापूरच्या गड्डा यात्रेचे हृदयात एक वेगळेच स्थान आहे. जानेवारी महिना आला की सोलापूरला जाऊन गड्डा यात्रेकडे जाण्याची इच्छा असते. पुढच्या वर्षी मी माझ्या मुलींना आवर्जून गड्डा यात्रा फिरण्यासाठी घेऊन जाईन. लहानपणी कुटुंबातील सदस्यांसह गड्डा यात्रेत जायचो.[२१]

## पर्यटनामुळे सोलापूरच्या विकासावर झालेला परिणाम

पर्यटनामुळे हाताला काम मिळतं, उत्पन्नातही भर पडतेच., या निमित्तानं आपली संस्कृती जपली जायला मदत होते. इतिहासाला उजाळा देता येतो, पुढच्या पिढीसाठी आपला इतिहास जिवंत राहतो. पण पर्यटनाकडे निव्वळ मनोरंजन म्हणून पाहता कामा नये., आराम, बदल, नवीन पाहण्याची, अनुभवण्याची संधी अशी अनेक उद्दिष्ट त्यात आहेत. पर्यटनामुळे नैसर्गिक व

मानवी वैशिष्ट्यांवर परिणाम होत असतात. विविध पर्यटनस्थळी त्या पर्यटन परिसरांतील निकटवर्ती ठिकाणी असलेल्या निसर्गावर तेथील मानवी समुहांच्या स्वभावात व संस्कृतीत दीर्घकालीन आणि दूरगामी पर पर्यटकांच्या वागणुकीमुळे, त्यांच्या संस्कृतीमुळे प्राप्त होणाऱ्या पैशामुळे कळत नकळत घडून येत असतात. मानवाच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रावर पर्यटनाचा परिणाम होत असतो. पर्यटनाचा सोलापूरच्या विकासावर पुढीलप्रमाणे परिणाम झाला आहे.

### १. सोलापूरच्या आर्थिक विकासावर झालेला परिणाम-

पर्यटन हा आधुनिक काळात एक स्वतंत्र राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय उद्योग म्हणून विकसित झाल्याचे दिसून येते. या उद्योगाचे महत्व आर्थिक विकास व रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचे एक साधन आहे. आर्थिक दृष्टिकोनातून पर्यटन उद्योग महत्वाचा ठरतो. पर्यटनामुळे सेवा क्षेत्राला महत्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. पर्यटनामुळे व्यापाराचे प्रमाण व परिणाम यांचा विस्तार झाला आहे. पर्यटकांना लागणाऱ्या वस्तू व सेवा पुरविण्यासाठी प्रवासी सेवा, मनोरंजन सेवा, परिवहन सेवा, गाईड, हॉटेल्स अशा अनेक पर्यटनाशी संबंधित व्यवसायांचा विकास झालेला दिसून येतो. त्या माध्यमातून लोकांना रोजगारही उपलब्ध झालेला आहे. गड्डा यात्रेच्या ठिकाणी एक मोठी बाजारपेठच निर्माण झालेली दिसून येते. परगावाहून मोठ्या प्रमाणात पर्यटक येतात. त्यामुळे परिवहन सेवा, टूर ट्रव्हल्स संख्येत वाढ होऊन परगावाहुन येणारे पर्यटक निवास करीत असतात. त्यामुळे हॉटेल्स, भवन, निवास, लॉज, धर्मशाळा, विश्रामगृहे इत्यादीचा विकास झालेला दिसून येतो. या सर्वांच्या परिणामामुळे सोलापूरातील दळणवळण, बँकिंग, आरोग्य, अन्न, निवास या पायाभूत सुविधांचा विस्तार झालेला आहे.

### २. सोलापूरच्या सामाजिक विकासावर झालेला परिणाम-

सोलापूर जिल्ह्यातील पर्यटनामुळे पर्यटकांची व स्थानिक लोकांची भाषा, आचार-विचार, खान-पान, जीवनपद्धती व संस्कृतीवर प्रभाव पडलेला आहे. सोलापूरारातील प्रसिद्ध गड्डा यात्रेत हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, जैन, बौद्ध असे सर्व धर्मातील तसेच वेगवेगळ्या जातीतील, वेगवेगळ्या भाषा बोलणारे, लोक मोठ्या आनंदाने सहभागी होऊन एकात्मता व समानतेचे दर्शन घडवतात. बाराबंदी हा पोशाख सर्व समाजातील लोक परिधान करतात हे सामाजिक ऐक्याचे प्रतिकच मानावे लागेल.

### ३. सोलापूरच्या सांस्कृतिक विकासावर झालेला परिणाम-

आज जागतिकीकरणाच्या वादळात भल्या-भल्या संस्कृती आपले स्वत्व गमावताना दिसत आहेत. तंत्रज्ञान व माध्यमक्रांतीमुळे सपाटीकरणाचा वरवंटा सगळीकडे फिरतो आहे. एखादी संस्कृती मुद्दाम फक्त पर्यटकांसाठी जपली जाते. अन तिचे इतके व्यापारीकरण होते की, पैसे दिल्याशिवाय कुठलाही अनुभव घेताच येत नाही. इतर सर्वत्र गावे, शहरे एकसारखी कपडे, अन्न, भाषा, सण, समारंभ सगळीकडे हा एकसारखेपणा. यातून वाचायचे असेल तर आपल्याला परंपरा घट्ट धरून ठेवण्याला पर्याय नाही. म्हणूनच कुणीही आमंत्रण न देता, आयोजन न करता सलग नऊशे वर्षे होत आलेला गड्डा यात्रेचा सोहळा हा उद्याच्या सोलापूरची ' आशा ' आहे. आपली स्थानिक संस्कृती आपण जिवंत ठेवली आहे. आणि ठेवणार आहोत याचे ते सुचिन्ह आहे. सगळे सोलापूर सिद्धेश्वरमय झाल्याचा हा उत्स्फूर्त अस्सल अनुभव कुठल्याही पर्यटकाला घेता येतो कारण तो पर्यटकांसाठी घडवलेला नाही तर मुळातच सशक्त, जिवंत उत्सव आहे.

## संदर्भग्रंथसूची व तळटीपा


१. आनंद कुंभार यांचा लेख,संशोधक ( त्रैमासिक ),जून २००४ पृ. २१

२. द गॅझेटियर आफ इंडिया,महाराष्ट्र स्टेट सोलापूर डिस्ट्रिक्ट १९७७ पृ. ८७

३. महाराष्ट्र राज्य गॅझेटियर,इतिहास प्राचीन कालखंड-१,महाराष्ट्र शासन मुंबई -२०१०पृ. ६९३

४. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटियर,१९७७ पृ. १

५. सोलापूर समाचार,दिनांक १ नोव्हेंबर १९७४ व ३०ऑक्टोबर १९७४

६. मडकी शशिकला, श्री सिद्धेश्वर वचनांजली, बसव महामने चॅरि. ट्रस्ट बसव मंटप, बेंगळुरू सन १९९३ पृ. १०२

७. पसारकर शे. दे. (संपा.), सिद्धेश्वर दर्शन, श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटी, सोलापूर,जाने/फेब्रु १९९८,पृ. ९,१०

८.गोसावीर. रा. पाचभक्ती सांप्रदाय,१९७४,पृ.३८१

९. रोडे सोमनाथ, सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा बसवेश्वर, विद्याभारती प्रकाशन लातूर,२०११ पृ. २२

१०. घुगरे सूर्यकांत, वीरशैव व इतर धर्म व समाज, साधना बुक स्टॉल, गडहिंग्लज,२००० पृ. ३४५

११. गर्जे अनिल काशीनाथ, सिद्धरामेश्वर विषयक मराठी वाड्मय एक विवेचक अभ्यास, पी.एच.डी. मराठी शोधनिबंध, स्वामीरामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ २००८ पृ.२९७

१२. शिवाचार्य: नीलकंठ, सत्यदर्शन, १९९२, पृ.१३

१३. कोट्टरशेट्टी एम. बी. सिद्धराम शिवयोगी कन्नड अध्ययन पीठ, कर्नाटक विश्वविद्यालय, धारवाड, १९७५ पृ. ७६

१४.सरदेसाई गो. स., मुसलमानी रियासत,खंड-१, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९९३ पृ.२३३

१५. दैनिक सकाळ कृपावंत सिद्धराम दिनांक १३/१/१०१७

१६.दैनिक संचार, विशाल फुटाणे, समन्वयाचे प्रतिक श्रीसिद्धरामेश्वर, दिनांक १४/१/१०१७

१७. https://sameerbapu.blogspot.com, समीर गायकवाड, सोलापूरची गड्डा यात्रा, नऊशे वर्षापासूनच्या एक अनोख्या यात्रेची गाथा.... दि. १३/१/२०१६

१८. पसारकर शे.द., (संपा.) श्री सिद्धरामेश्वरांची वचने, खंड- १, श्री सिद्धे. देव. पंचकमिटी, सोलापूर, १९९८ पृ. १२

१९. सीमंतिनी चाफळकर, सिद्धेश्वर यात्रेने घडविले सांस्कृतिक अभिसरण, दैनिक संचार- १४/१/२०१७

२०. सोन्नलगी श्री सिद्धरामेश्वर दिव्य मराठी दि. १४/१/२०१७

२१. परशुराम कोकणे, सोलापूरची गड्डा यात्रा जगात भारी! दैनिक सकाळ ई पेपर दि. १२/१/२०१८ सकाळी ९.३३